महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781 / 82 / 83
25536712 (OFF)

E-MAIL sscboardpune@gmail.com

जा.क्र.पुविमं/उमा/अ/210
पुणे–411004
दिनांक. 10/01/2025
13

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यामिक विद्यालये/
कनिष्ठ महाविद्यालये.
जिल्हा – पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय:–फेब्रुवारी–मार्च 2025 च्या उच्च उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत...**

**संदर्भ :–क,रा,मं,/परीक्षा–7/121, दिनांक 09/01/2025 रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयस अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च 2025 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना फेब्रुवारी/मार्च–2025 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेची प्रवेशपत्रे ( Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शुक्रवार दि. 10 जानेवारी 2025 पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरीता उपलब्ध होतील.

1. फेब्रुवारी/मार्च–2025 ची सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी (इ.12वी) परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विदयार्थ्यांना दयावयाची आहेत.
2. प्रवेशपत्रे ( Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विदयार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
3. ज्या आवेदनपत्रांना "paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
4. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विदयार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.
5. Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/जन्मतारीख अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरिता Application Correction ही

Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहीत दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "Correction Admit Card" या Link व्दारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील.विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

6. ज्या आवेदनपत्रांना "paid" असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्र उपलब्ध होतील.

7. फोटो सदोष असल्यास त्यावर विदयार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर संबधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

8. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विदयार्थ्यांस प्रवेशपत्र दयावयाचे आहे.

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना प्रवेशपत्र Download करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. No Candidate केलेल्या परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विदयार्थ्यांना वितरीत करू नयेत.

उपरोक्तनुसार वरील बाबी विदयार्थ्यांना अवगत करून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

प्रत माहितीस्तवः–

1.मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.
2.मा. शिक्षण उपसंचालक पुणे,विभाग पुणे.
3.शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. कार्यालय पुणे, अहिल्यानगर व सोलापुर,